महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, रोजगार शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, टू-व्हीलर मेकॅनिक, A.C. मेकॅनिक, कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑटोमोबाईल टेक्निशियन, मोटार वायडिंग, फोर व्हीलर मेकॅनिक, वेल्डर / प्लंबर, कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे परसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटसॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५ वा | मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

..तर देवेंद्र फडणवीस यांना पळता भुई थोडी होईल; उद्धव ठाकरे

मुंबई (कटूसत्य वृत्त):- आज संपूर्ण महाराष्ट्र जागा झाला आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात शिवसेना रस्त्यावर उतरली आहे. सत्ताधाऱ्यांशी संघर्ष करायला मर्द लागतो, तो मर्द आपल्या शिवसेनेत आहे.

भ्रष्टाचाऱ्यांचं करायचं काय? खाली डोकं वर पाय. पण यांना डोकं असेल तर ना, यांना नुसते पाय आहेत सुरत आणि गुवाहाटीला पळून जायला. असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे.

काय म्हणाले उद्धव ठाकरे?

आज दिल्लीमध्ये इंडिया आघाडीतर्फे विरोधी खासदारांचा मोर्चा निघाला आहे. तो पोलिसांनी अडवल्याचं समजतं आहे. या सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्र भ्रष्टाचाऱ्याच्या पहिल्या रांगेत बसवला आणि विकासाच्या रांगेत शेवटी बसवला आहे. यांचा कारभार जनताभिमुख नाही तर पैसे गिळणाऱ्याचं यांचं तोंड आहे. कुणी डान्सबार चालवतंय, कुणी बॅगा घेऊन बसलंय. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला काही वेळ नाही. देवेंद्र फडणवीस भाजपाची परंपरा पुढे चालवणारे आहेत असं वाटलं होतं. पण त्यांनी गैरवर्तन करणाऱ्यांना फक्त समज देऊन सोडून दिलं

आहे. भ्रष्टाचाऱ्यांविरोधात पुरावे असूनही सोडून देणार असाल तर मग धनकड कुठे आहेत याचंही उत्तर द्या. असंही उद्धव ठाकरे म्हणाले. धनकड यांचा राजीनामा का घेतला? हे कळलेलंच नाही. त्यांना तडकाफडकी काढून गायब केलं. धनकड यांना समज का दिली नाही? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला.

चीनचा पॅटर्न भारतात राबवला जातो आहे ?

चीनमध्ये कळत किंवा नकळत सरकारमध्ये कुणी काही बोललं तर तो माणूस गायब होतो. उपराष्ट्रपती आहेत कुठे? ते तरी दाखवा. त्यांची प्रकृती बिघडली असेल तर ते कुठल्या रुग्णालयात आहेत? की तुम्ही त्यांचं ऑपरेशन केलं? याचं उत्तर द्या असंही उद्धव ठाकरे म्हणाले. आज मी सगळ्यांना म्हणजेच सगळ्या शिवसैनिकांना सांगतोय मोदींनी जशी चाय पे चर्चा केली होती तशी तुम्ही आता लोकांशी चर्चा करा. आता भ्रष्टाचार पे चर्चा करा. भ्रष्टाचारी मंत्री जोपर्यंत हाकलले जात नाहीत तोपर्यंत आपलं आंदोलन थांबणार नाही.

मला देवेंद्र फडणवीस यांची कीव येते आहे-उद्धव ठाकरे

मला देवेंद्र फडणवीस यांची कीव येते, तुमच्याकडे पाशवी बहुमत आहे, दिल्लीत तुमचे बाप बसले आहेत तरीही भ्रष्टाचाऱ्यांना तुम्ही काढून टाकत नाही? देवेंद्र फडणवीस यांनी काही भ्रष्टाचार केला नाहीये असं गृहीत धरु मग तुम्ही भ्रष्ट लोकांवर पांघरुण का घालता? भाजपा म्हणजे भ्रष्टाचारी जनता पक्ष त्यांच्याकडे अध्यक्ष करायला माणूस नाही. तसं भ्रष्ट मंत्र्यांच्या जागीही कुणी मिळत नाही का? देवेंद्र फडणवीस यांनी सांगावं मला या लोकांना काढायचं आहे पण सहन होत नाही आणि सांगता येत नाही असा दबाव आहे. आमचं तर म्हणणं आहे की झुगारुन द्या सगळा दबाव. देवेंद्र फडणवीस हे चीफ मिनिस्टर नाहीत तर थीफ मिनिस्टर आहेत असं काँग्रेसने त्यांना म्हटलं आहे. चांगला शब्द दिला आहे. देवेंद्र फडणवीसांमध्ये थोडासा जरी स्वाभिमान असेल तर वरचा दबाव पाहू नका. कारण इथला दबाव वाढला तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल.

एकाच बॅलेट युनिटवर जि.प., पं.स.चे उमेदवार'; निवडणुकीची तयारी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या ३३६ पंचायत समित्यांची प्रारूप प्रभागरचना सध्या अंतिम टप्प्यावर आहे. येत्या १८ ऑगस्टला ही प्रभागरचना अंतिम होणार आहे. यापूर्वी २०१७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत जिल्हा परिषदेसाठी स्वतंत्र व पंचायत समित्यांसाठी स्वतंत्र बॅलेट युनिट वापरण्यात आले होते. आता २०२५ मध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीतील उमेदवारांची नावे एकाच बॅलेट युनिटवर असण्याची शक्यता आहे. तशा सूचना राज्य निवडणूक आयोगाने त्या-त्या जिल्हा प्रशासनाला दिल्याचेही समजते.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्या, महापालिका व नगरपरिषद- नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचनेची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वात पुढे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया आहे. महापालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींची प्रारूप प्रभागरचना अद्याप जाहीर होणे बाकी आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभागरचना १८ ऑगस्टला अंतिम झाल्यानंतर साधारणतः याच महिन्याच्या शेवटपर्यंत किंवा फार तर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात गट व गणांची आरक्षण सोडत होण्याची दाट शक्यता आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी प्रत्यक्ष मतदान होण्याची दाट शक्यता आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीतील उमेदवारांची नावे एकाच बॅलेट युनिटवर आल्यास मोठ्या पक्षांच्या उमेदवारांना प्रचारासाठी आणि विजयासाठी सोपे होणार आहे. अपक्ष व स्थानिक आघाड्या करून लढणाऱ्यांसाठी मात्र ही पद्धत आल्यास डोकेदुखी वाढण्याची दाट शक्यता आहे. मतदारांनी केलेले मतदान त्याच पक्षाला व उमेदवाराला झाले आहे का? हे पाहण्यासाठी यापूर्वी व्हीव्हीपॅट मशिनचा वापर केला जात होता. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरले जाणार नसल्याचे राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

उमेदवार निश्चितीनंतर ठरणार 'बीयू'

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी किती बॅलेट युनिट व किती कंट्रोल युनिट लागणार? याचा निश्चित आकडा उमेदवारांच्या माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे. एका बॅलेट युनिटवर १५ उमेदवारांची नावे येतात. एका जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी १५ पेक्षा जास्त उमेदवार मैदानात राहिल्यास दुसरे बॅलेट युनिट लावले जाणार आहे. छाननीत वैध ठरलेले अर्ज माघारीनंतरच लढतीचे चित्र आणि बॅलेट युनिटची संख्या स्पष्ट होणार आहे.

सोलापुरात एकूण सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद, उजनी धरण शंभर टक्क्यांवर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गेल्या तीन दिवसांनंतर सोलापुरात पुन्हा पावसाला सुरुवात झाली. आज सकाळअखेर पडलेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी १६.३ मिमी इतका पाऊस झाला. सर्वात जास्त पाऊस अक्कलकोटमध्ये २८.७ तर सर्वात कमी म्हणजे प्रत्येकी ३.३ मिमी पाऊस करमाळा आणि बार्शी या तालुक्यात पडला.

दरम्यान, गेल्या मे महिन्यापासून झपाट्याने भरलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा नंतर परिस्थिती पाहून नदीवाटे सोडल्यामुळे धरणाची पातळी कमी ठेवण्यात आली होती. परंतु, अखेर आज सकाळी सहा वाजता धरण प्रथमच १०० टक्के भरले. यात धरणातील एकूण पाणीसाठा ११७.५४ टीएमसी तर उपयुक्त पाणीसाठा ५३.९३ टीएमसी इतका झाला आहे. धरणातील पाणीसाठा १००.६७ टक्के इतका झाला आहे.

सोलापुरात गेल्या तीन दिवसांनंतर पुन्हा पाऊस सुरू झाला आहे. अक्कलकोट-२८.७ मिमी, सांगोला-२६.०, दक्षिण सोलापूर-२१.२ मिमी, माढा-२०.७, उत्तर सोलापूर-१९.५, मोहोळ-१८.३, पंढरपूर-१७.९, माळशिरस-१६.०, मंगळवेढा-१५.२, करमाळा आणि बार्शी-प्रत्येकी ३.३ मिमी याप्रमाणे कमीजास्त पावसाची नोंद झाली आहे. चालू ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत एकूण सरासरीच्या पडलेल्या पाऊस जास्त झाला आहे. तालुकानिहाय एकूण पाऊस आणि सरासरी पाऊस याप्रमाणे आहे.

उत्तर सोलापूर (११६.०, ८६.७), माळशिरस (५८.३, ७५.८), मोहोळ (७०.३, ६५.०), माढा (५७.७, ५६.९), दक्षिण सोलापूर (७६.७, ५२.०) अक्कलकोट (६६.२, ४८.५), पंढरपूर (५२.९, ४७.७) याप्रमाणे एकूण सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. मंगळवेढा (४४.३, ४८.९) व करमाळा (२६.२, २६.९) येथे मात्र एकूण सरासरीपेक्षा कमी प्रमाणात पाऊस झाल्याचे दिसून आले. उजनी धरणाची एकूण पाणी पातळी ११७ टीएमसी होऊन धरण शंभर टक्के भरले असले तरी धरणात आणि ६ टीएमसी अतिरिक्त पाणी साठवून येते. म्हणजे एकूण १२३ टीएमसी एवढा पाणीसाठा होऊ शकतो.

अमेरिकन साम्राज्यवादाचा निषेध, 13 ऑगस्टला देशव्यापी आंदोलन!

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्क्यांपर्यंत अतिरिक्त कर लादण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे भारतीय उद्योग आणि शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम होणार आहेत. व्यापार वाटाघाटी सुरू असतानाही अमेरिकेकडून सातत्याने धमक्या देण्यात येत आहेत.

रशियाकडून भारत तेल व शस्त्रास्त्रे विकत घेत असल्याने ती खरेदी थांबवण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अन्यथा, २७ ऑगस्टपासून आणखी २५ टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा करण्यात आली आहे. या कृतीतून अमेरिकन साम्राज्यवादाचा कुरूप चेहरा उघड झाला असून, भारताच्या सार्वभौमत्वावर व स्वतंत्र व्यापार धोरणांवर सरळ आक्रमण केले जात आहे.

सीटूसह सर्व कामगार संघटनांचे आवाहन आहे की, भारत सरकारने अशा कारस्थानांना बळी पडू नये. नुकत्याच

झालेल्या युरोपियन युनियन व युनायटेड किंगडमसोबतच्या 'सीईटीए'सारख्या करारांमध्ये झालेल्या तडजोडीमुळे शेती, दुग्ध व्यवसाय आणि औद्योगिक क्षेत्रावर संकट अधिक गडद झाले आहे. यामुळे ब्रिटन, युरोपियन युनियनसह साम्राज्यवादी देशांना फायदा होत असून, भारतीय शेतकरी व कामगार यांचे नुकसान होत आहे.

अशा पार्श्वभूमीवर, अमेरिकेसोबत सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींमध्ये अमेरिकन अटींना मोदी सरकार बळी पडू नये, अशी मागणी सर्व कामगार संघटनांनी केली आहे. सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली दहा वर्षांचा संरक्षण करार करण्याचा प्रयत्न त्वरित थांबवावा, अशीही भूमिका व्यक्त करण्यात आली आहे.

अमेरिकेच्या धमक्यांना विरोध करण्यासाठी १३ ऑगस्ट २०२५ रोजी देशव्यापी निदर्शने व डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुतळ्याचे दहन करण्याचे आवाहन सर्व कामगार संघटना आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी केले आहे. या आंदोलनात देशभक्त जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. डी. एल. कराड, प्रमुख समन्वयक झ कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्याध्यक्ष सीटू, तसेच एम. एच. शेख, राज्य सरचिटणीस सीटू यांनी केले आहे.

ई- पीक पाहणी त्वरीत करून घेण्याचे महसूल प्रशासनाचे आवाहन

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- शेतकऱ्यांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे 7/12 उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी 1 ऑगस्ट 2025 पासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनामार्फत महसुल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प 2021 पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केंद्र

शासनाच्या सूचनेनुसार या प्रकल्पात सुधारणा करून रब्बी हंगाम 2024 पासून पीक पाहणी ही डिजिटल क्रॉप सर्वे प्रणालीद्वारे संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.

सध्या खरीप हंगामातील पीक पाहणी कार्यवाही सुरू आहे. खरीप हंगाम 2025 साठी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपचे व्हर्जन 4.0.0 अद्ययावत स्वरुपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ॲपचे अपडेट करून घ्यावे. खरीप हंगामातील शेतकरी स्तरावरील पीक पाहणी 1 ऑगस्ट ते 14 सप्टेंबर 2025 या कालावधीत तर सहाय्यक स्तरावरील पीक पाहणी 15 सप्टेंबर ते 29 ऑक्टोबर 2025 या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी शक्य तितकी पीक पाहणी स्वतः पुर्ण करावी. पीक पाहणी दरम्यान काही अडचणी आल्यास, संबधित गावकामगार तलाठी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच खरीप २०२५ ची पीक पाहणी सर्व शेतकरी बांधवांनी शासनाने दिलेल्या विहित मुदतीत पुर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी आहे.

सोलापूर जिल्ह्यात रोज ४० जनावरांना 'लम्पी स्कीन' ची बाधा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यात आतापर्यंत एक हजार ८५४ लम्पीबाधित जनावरे आढळली आहेत. त्यातील एक हजार ३८० जनावरे बरे झाले आहेत. जनावरे बरे होण्याचे प्रमाण चांगले असले तरी रोज जिल्ह्यात ३० ते ४० लम्पीबाधित जनावरांची भर पडत आहे.

तर ५४ जनावरांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पशुपालकांनी गोवर्गीय जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाने केले आहे.

जिल्ह्यात लम्पीची साथ असून संसर्ग रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने संपूर्ण जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. तर पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. जिल्ह्यात सात लाख ७४ हजार गोवर्गीय जनावरे आहेत. त्या तुलनेत सध्याची लम्पीबाधित जनावरांची संख्या नगण्य आहे.

मात्र, जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांतून रोज ३० ते ४० लम्पीबाधित जनावरे आढळत आहेत. तर ४१५ सक्रिय लम्पीबाधित जनावरे आहेत. त्यामुळे पशुपालकांनी गोवर्गीय जनावरांची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तसेच उपाययोजना करतानाच नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधण्याची आवश्यकता असल्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाकडून सांगण्यात आले.

सेसमधून एक लाख ९० हजार लसी उपलब्ध

जिल्हा परिषदेने सेसमधून एक लाख ९० हजार ४०० लसी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या गुरुवारी (ता. ७) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाला प्राप्त झाल्या असून त्यांचे पंचायत समिती स्तरावर तातडीने वितरण करण्यात येणार आहे. आजारी नसलेल्या जनावरांना लसीकरण केले जाणार असल्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाने सांगितले.

सोलापूरजिल्ह्यातील सर्वच तालुक्यांत रोज ३० ते ४० लम्पीबाधित जनावरे आढळत आहेत. जनावरे बरे होण्याचे प्रमाण चांगले आहे. सोलापूर शहरातील मोकाट जनावरांना लम्पीची लागण झाल्याचे आढळल्यावर त्यांच्या विलगीकरणाची महापालिकेने सोय केली आहे. मात्र, लम्पीची लागण झालेली गोवर्गीय जनावरे मोकाट सोडू नये. पशुपालकांनी उपाययोजना करतानाच जनावरांवर उपचार करून घ्यावेत.

निरामय पॅरालिसिस सेंटर
ISO 9001:2015
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu).,P. G (Sexology)
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

संपादकीय

नोटरी वरील करार

जर एखादा पक्षकार एखादा दस्त पुराव्याकामी वाचण्यास इच्छुक असेल तर त्याने मुद्रांक व त्याचा दंड भरणे हे त्याचे प्रथम कर्तव्य असून त्यानंतरच तात्पुरती मनाई मिळू शकते. नोटरी दस्तावर केलेला करार खटला चालू होण्याअगोदर प्राथमिक स्तरावर सिद्ध करता येणे अशक्य असते अशा वेळी व्यवहाराबद्दल दोन्ही पक्षकारांची वेगवेगळी कथने असताना, जमिनीचा ताबा दिल्याचा पुरावा नसताना, मुद्रांक शुल्क कायद्याची पूर्तता नसताना अंतरिम मनाईचा आदेश पारीत करणे ही न्यायालयाची चूक आहे, असे स्पष्ट करीत दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालय यांनी दिलेला अंतरिम मनाईचा आदेश रद्द करण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने 29 जुलै रोजी सलीम बेग विरुद्ध सय्यद नावीद या खटल्यात दिला आहे. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला आहे. अपिलाची विस्तृत माहिती अशी की याचिकाकर्ता हा एका मिळकतीचा मालक आहे. त्याने त्याची जमीन 92 लाख 50 हजार रुपयाला देण्याबाबत विक्री करार करून नोटरीवर ताबे विसार पावती केली. त्यावेळी विसार म्हणून दोन लाख व नंतर दोन टप्प्यात एकूण 22 लाख रुपये (मूळ वादी) विकसनकर्ताकडून घेतले. सदर विसार पावती दस्तातील मजकुराप्रमाणे वादींनी सदर जमीन विकसित करून विक्री योग्य प्लॉट तयार करायचे, ते विक्री करायचे व आलेली रक्कम मालकाला देऊन वेळोवेळी खरेदीदाराला भरणा पावती करून द्यायची. तीन वर्षांत 25 जून 2022 पर्यंत मालकाने त्या जमिनीवरील बोजा कमी करून ती जमीन नोंदणीकृत विक्री दस्ताने विक्री करायची आहे असे ठरले. त्याप्रमाणे वादीने (विकसन कर्ता याने) मालकाला सांगितले की मी उर्वरित रक्कम द्यायला तयार असून तुम्ही खरेदीखत करून द्या, अशी मागणी केली. त्यावर मालकाने मी तुम्हाला जमीन विकसित करण्यासाठी व विक्री योग्य प्लॉट तयार करण्यासाठी दिली होती. मात्र, तुम्ही करारामध्ये नमूद केलेल्या तीन वर्षांच्या मुदतीत तशी विकसित केली नाही असे सांगून खरेदीखत करून देण्यास नकार दिला. तसेच विसार पावतीनुसार आपण 22 लाख रुपये घेतल्याचे ही मान्य केले. त्यामुळे कनिष्ठ न्यायालयामध्ये वादी (विकसन कर्ता) यांनी अशी मागणी केली की जमीन मालकाने माज्या ताब्यावर कोणतीही हरकत अथवा अडथळा आणू नये. यासाठी तात्पुरती मनाई जमीन मालकाला करण्यात यावी. त्यानुसार कनिष्ठ न्यायालयाने वादीचा (विकसन कर्ता याचा) अर्ज मंजूर करून जमीनमालकाने विकसन कर्ता वादी यांच्या ताब्याला हरकत करू नये असा आदेश दिला, जिल्हा न्यायालयाने देखील मालकाचे अपील फेटाळून तो आदेश कायम केला. त्यानंतर जमीन मालकाने उच्च न्यायालयात अपील केले.

उच्च न्यायालयात याचिकाकर्ता मालकाने युक्तिवाद करताना सांगितले की सदर करार हा विक्री करार नव्हता तर तो विकसनाचा करार होता. त्याद्वारे वादीने सदर जमीन विकसित करून विक्री योग्य प्लॉट तयार करून संभाव्य खरेदीदारांना विशिष्ट वेळेत विक्रीची सुविधा देणे व जमीन मालकाला ठरलेली रक्कम देणे असा करार आहे. सदर नोटरी दस्त हा नोंदणीकृत दस्त नसून 100 रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर केलेला असून सदर जमिनीच्या विकसनासाठी वादीला परवानगी असली तरी सदर जमिनीचा ताबा कधीही वादीकडे (विकसनकर्ता) नव्हता असे सांगितले. कनिष्ठ न्यायालयानी करारातील मजकुराप्रमाणे मालकाने ताबा दिला आहे, असे गृहीत धरून जमीन मालकाने विकसनकर्ता याचे ताब्यातील जमिनीवर हरकत अथवा अडथळा करू नये असा तात्पुरत्या मनाईचा आदेश दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अविनाश कुमार चौहान विरुद्ध विजय कृष्णा मिश्रा या खटल्यातील तरतुदीनुसार योग्य मुद्रांक नसलेले दस्त कोणत्याच उद्देशासाठी वापरले जाऊ शकत नाहीत. वादीच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाच्या अमीर मिन्हाज विरुद्ध डायरडे एलिझाबेथ 2019 (3) एमएचएलजे 550 या खटल्याचा संदर्भ देऊन सांगण्यात आले की प्राथमिक स्तरावर मुद्रांकाबाबतचा मुद्दा लक्षात घेण्याची गरज नसून जेव्हा पुराव्यासाठी एखादे कागदपत्र येते तेव्हा न्यायालयाला ते मुद्रांक कायदा कलम 35 खाली मुद्रांक भरून घेण्याचे आदेश देण्याचे अधिकार आहेत. तसेच मरसीज बिल्डर्स प्रा. ली. विरुद्ध शेख महमद बेपारी व इतर 2017(5) ऑल एमआर 401मधे देखील सर्वोच्च न्यायालयाने समजुतीचा करार जरी नोंदणीकृत नसला तरी पुराव्यावेळी योग्य तो मुद्रांक भरता येऊ शकतो, असे सांगितले आहे.

दोन्ही बाजू ऐकून व झालेल्या कनिष्ठ न्यायालयाचे आदेश वाचल्यावर उच्च न्यायालय म्हणते की असे दिसून येते की, दोन्ही पक्षकारांनी 26 जून 2020चा विसार पावतीचा दस्त मान्य केला आहे. मात्र तो विकसनासाठी की विक्रीसाठी याबाबत वाद निर्माण केला आहे. कराराची वैधता 25 जून 2025 पर्यंत होती. करार अपुरा मुद्रांक असल्याने अमान्य आहे.जागेचा ताबा दिलेला नाही. मूळ वादी हा जमीन खरेदी विक्री व्यवसायात आहे व त्याने विकसन करण्याचे आश्वासन देऊन जमीन मालकाला करार करण्यास प्रवृत्त केले असून त्याचा स्वतःसाठी कधीही जमीन खरेदी करण्याचा विचार नव्हता.

वरील बाबींचा विचार करता सदर करार 100 रुपयांच्या स्टॅम्पवर झाला असून सदर करारात ताब्याचा उल्लेख आहे. त्यामुळे भारतीय मुद्रांक कायदा कलम 35 नुसार व विविध खटल्यातील निकालानुसार अपुरा मुद्रांक असलेला दस्त कोणत्याही दुय्यम उद्देशासाठी वापरला जावू शकत नाही. सदर खटल्याचे अवलोकन करता फक्त करारात वर्णन केलेल्या मजकुराव्यतिरिक्त प्रत्यक्ष जमिनीचा ताबा दिल्याबाबत एकही पुरावा दिसून येत नाही, तसेच कराराचे स्वरूप ही प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही. कनिष्ठ न्यायालयांनी केवळ करारामधील मजकुराच्या आधारे तात्पुरती मनाई आदेश दिला असल्याने तो चूक आहे. तसेच तात्पुरती मनाई देताना प्रथमदर्शनी मुद्रांकबाबत विचार करणेचे गरजेचे नसल्याचे मत कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही. त्यामुळे जमीन मालकाने (वादी) विकसनकर्त्याच्या ताब्याला हरकत करू नये हा कनिष्ठ न्यायालयाने दिलेला आदेश खंडपीठाने रद्द केला आहे. तसेच जमीन मालकाने अथवा त्यांचे वतीने तात्पुरत्या स्वरूपात जमीन हस्तांतरित करू नये, असा आदेश देखील खंडपीठाने दिला आहे.

चित्रकला : जगात कलेचे करा सादरीकरण....!

तो शनिवारचा दिवस होता आम्ही सहजच कुटुंबाला घेऊन फिरायला निघालो होतो. अशातच एका रेस्टॉरंट पाशी विद्यार्थ्यांनी त्यांचे चित्रकलेचे स्टॉल लावले होते. बराच वेळ चित्र पहात असताना असे लक्षात आले की या सृष्टीत कला खूप आहे. पण त्याचे सादरीकरण करणे फार गरजेचे वाटत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांची कला कॅनवसवर उत्तमरित्या उतरवली होती. कला सर्व रसिक कलाकारांनी उत्स्फूर्तपणे सादर केली होती. खरं पाहिलं तर मी नेहमीच म्हणाल्याप्रमाणे या जगात प्रत्येक रेषा, रंग, छटा आणि आकार याला अर्थ आहे. हा अर्थ चित्रकाराच्या मनातून रसिक मनापर्यंत पोहोचवण्याचे काम कलाकारांनी केले पाहिजे. काढलेले चित्र आणि त्याच्या भावना या योग्यरीत्या जर समोर पोहोचल्या तर रसिक आणि खरेदी करणारे लोक नक्कीच कलेला चांगली किंमत येऊन विक्रीच्या स्वरूपात एक कलाकाराला प्रोत्साहन मिळेल. तसे पाहिलं तर मी एका शाळेत, महाविद्यालय गेलो, काही व्यावसायिक आणि हौशी चित्रकार असताना तिथल्या विविध लोकांबरोबर संवाद साधला. चित्रकला ही मनातील भाव, छटा वेगळेवेगळे मनस्थिती कागदावर किंवा कॅनवर उतरवण्यास मदत करते, कला आणि कलाप्रेमी बरोबर संवाद साधल्यावर असे लक्षात आले की ताण-तणाव, दुःख, त्रास, दग दग कमी करायचे असेल तर चित्रकला किंवा इतर कला या महत्त्वाच्या ठरतात. त्यांचा खारीचा नाही तर मोठा वाटा या मनातून चित्राद्वारे उतरताना दिसतात. चित्रातील विविधता, चित्राचे स्पष्टीकरण, चित्रातील रंग, त्याच्या मागचे उद्देश, मनातील रंग अशा अनेक गोष्टी या मानवी मनातून आणि हृदयातून कागदावर किंवा कॅनव्हास वर उतरताना दिसतात. आज सहजच कलेचे साहित्य मिळते. त्यामुळे विद्यार्थी असो हौशी चित्रकार असो व्यवसाय चित्रकार असो किंवा अगदी सामान्य चित्र काढणारा सामान्य माणूस असो त्यांनी साहित्य घेऊन आपल्या मनातील भावभावना या उतरवल्या पाहिजेल, त्यातून त्याला मानसिक योगा किंवा मानसिक शांती, अगदीच काय मानसिक आनंद हेही मिळेल. बोलताना असे लक्षात आले की मानवी मनामध्ये ज्या ही घटना घडत आहेत, त्या चित्राच्या स्वरूपात कागदावर उतरवता येतात. त्यामुळे उस्फूर्तपणे कला सादर करणे हा एकमेव उद्देश आपल्यासमोर असला पाहिजे. त्याला जोड म्हणजे ही कला दुसऱ्यांना सादर करण्यामध्ये आपण कमी पडू नये. सर्व चित्रातील व्यवसाय चित्रकार असो किंवा हौशी चित्रकार असो यांनी उत्स्फूर्तपणे आणि कला कौशल्याने ही चित्रे जगासमोर सादर केली पाहिजे. खरंतर जग हे कलेच आणि कलाकारांनी भरलेले आहे. जो मनुष्य स्वतःच्या मनातील खोली चित्राच्या स्वरूपात व्यक्त करतो, सादर करतो अशाला जग मानत आहे. त्यामुळे चित्रकारांनी चित्र काढताना सामाजिक भान ठेवून आपल्या भावना जगासमोर मांडल्या पाहिजेल. तरच कलेला उभारी मिळेल, हे जग नेहमीच कलाकारांचे कदर करत आले आहे आणि याला खरे उतरायचे असेल तर कलाकारांनी एक पाऊल पुढे टाकून आणि वेळेच्या पुढे जाऊन आपली कला आणि मनातील भावना कलेच्या स्वरूपात चित्रकलेच्या स्वरूपात किंवा कुठल्याही इतर कलेच्या स्वरूपात मांडत राहिला पाहिजे. जगात सर्व गोष्टीला अर्थ आहे प्रत्येक चित्र हे या जगात अस्तित्व दाखवते आणि त्यामुळे आपले अस्तित्व निर्माण करायचे असेल तर चित्रकले सारखी संधी किंवा इतर कला दाखवण्याची संधी सोडू नये, असे वाटते. जगात सर्व कलाकारांना मान मिळवायचा असेल आणि उभारी द्यायचे असेल तर त्यांनी आपली कला योग्यरीत्या जगासमोर मांडली पाहिजे आणि त्याचे सादरीकरण केले पाहिजे पैसे कमवणे किंवा धन कमवणे हे एकमेव उद्देश नसून कलेच्या स्वरूपात या जगात आपला ठसा उमटवण्याचे काम कलाकारांनी करावे. अनेक संवाद होतात, अशा संवादातून कलाकारांना आणि कलेला उभारणी द्यायचा काम कलाकारांनी करावे असे कार्य आपल्या हातून घडावे एवढे सांगू इच्छितो.

ऋत्विज चव्हाण
मो 8380800083
9527377555

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा

मुंबई (कटूसत्य वृत्त):- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहेत. शासन निर्णय क्र. पुलदे-२०२५/प्र.क्र.७४ (ई-११४४०९५)/सां.का. २, दिनांक २० जून, २०२५ या अन्वये शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला असून या स्पधेर्ची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या शासन निर्णयातील परिशिष्ट ह्यअह्न मधील विहीत नमुन्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने, स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या इमेलवर गणेश चतुर्दशीच्या एक दिवसापूर्वीपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याकरीता स्पर्धा आयोजन करुन अभिप्रायासह गुणांकन करुन प्रस्तावास शासनास सादर करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून ही समिती गणेश मंडळाच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देणार आहेत. या जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येवून तीन गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांची नावे सर्व कागदपत्र आणि व्हीडीओसह राज्य समितीकडे देण्यासाठी जिल्हाधिकारी मार्फत प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचेकडे सादर करतील.

या गणेशोत्सव स्पर्धेच्या निकालाचा दिनांक, सर्व विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरणचा समारंभ कोठे व कसा करायचा याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय यांच्याकडून स्वतंत्र सूचना देण्यात येतील, असे मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सणासुदीच्या काळात 'सण महाराष्ट्राचा'

: संकल्प अन्न सुरक्षेचा 'विशेष मोहीम' - मंत्री नरहरी झिरवाळ

मुंबई (कटूसत्य वृत्त):- सणासुदीच्या काळात होणारी संभाव्य भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून सण महाराष्ट्राचा संकल्प अन्न सुरक्षेचा या राज्यव्यापी मोहिमेचा आरंभ अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते नाशिक येथे करण्यात आला.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, ही मोहीम दिवाळी संपेपर्यंत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असून मिठाई, खाद्यतेल, खवा, मावा दूध आदी अन्न पदार्थांच्या गुणवत्तेवर यामध्ये विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

राज्यात आगामी काळात साजरे होणारे सण पोळा, गणेशोत्सव, ईद, गौरी पूजन, नवरात्र महोत्सव, दसरा व दिवाळीच्या अनुषंगाने या

मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. तपासणीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्यास त्या आस्थापनांचे परवाने रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. अखाद्य, अपायकारक नमुने नियमानुसार नष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व अन्न सुरक्षा आणि मानके नियम, २०११ नुसार शास्तीबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तपासणी मोहिमेत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त यांचाही सहभाग असणार आहे. सणासुदीच्या काळात महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील टोलनाक्यांवर परराज्यातून येणाऱ्या खव्यासारख्या पदार्थांच्या अचानक तपासणी मोहिम सोबतच सुरक्षित अन्न पदाथार्बाबत प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार आहे. ही मोहीम दिवाळीसंपेपर्यंत दर महिन्याला नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

प्रबोधन

उदरभरण । श्रेष्ठ यज्ञकर्म

उपवासाने स्वर्ग मिळणं शक्य असतं, तर तो आपल्या देशातील तीस-चाळीस टक्के भुकेकंगालांना आणि मध्यमवर्गीय माता-भगिनींनाही प्राप्त झाला असता. कारण या माता-भगिनी पोथ्या-पुराण वाचणाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडून उपवासाचे दुष्परिणाम हट्टाने सहन करीत अन्न वर्ज्य करीत असतात. राजकारणातील पेचप्रसंग सोडवण्यासाठी गांधीजींनी अनेकदा उपोषणं केली आणि त्यांना राष्ट्रपिता ही आदरणीय पदवी मिळाली. पण धार्मिक व्रतवैकल्यांच्या नादाने आतडी वाळवून घेणाऱ्या माताभगिनींना काय मिळालं? निसर्गानें त्यांना ॲसिडिटी दिली, ॲनिमिया- रक्तक्षय दिला, अशक्तपणा दिला. आरोग्याच्या क्षेत्रातून त्यांना रोगटपणाच्या प्रदेशात हाकलून लावलं आणि त्यातील थोर आध्यात्मिकांना जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचं मुक्त केलं. स्वामी विवेकानंदांनी म्हटलं, 'ज्यांच्या अंगात बळ नाही, वृत्तीत उत्साह नाही, मनात विचार नाही, ते आयुष्यात काही करू शकत नाहीत.' म्हणून तर शारीरिक आरोग्याला थोर पुरुषांनी फार महत्त्व दिलं आहे. शरीरमाद्यं खलुधर्मसाधनम-अर्थात, शरीर हेच पुरुषार्थीपणे जगण्याचं मुख्य साधन आहे.

श्रावण महिना हा तर व्रतउपवासाने समाजाचा शक्तिपात घडवण्यात बारा महिन्यातील अग्रगण्य महिना! ह्याच काळात मुस्लिमांचे 'रमजान'चे रोजे आणि जैनाचे 'पर्युषण' सुरू असते. एरवी सुद्धा ह्या देशाला कोणतं ना कोणतं व्रत करून उपवास केल्याशिवाय चैनच पडत नाही. बुद्धिवादी विचारवंत प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, 'या धर्मशील देशाची धर्मपरायणता कोठवर वणार्वी? म्हणाल त्या दिवसासाठी सांगण्यासारखी व्रतवैकल्यं स्त्रियांच्याच बोकांडी बसतात आणि त्यांना खऱ्या अथार्नें बकाल किंवा निर्बला करून सोडतात.' दीडशे वर्षांपूर्वी स्त्रियांवरील व्रत- उपवासाबद्दल आपली नापसंती व्यक्त करताना लोकहितवादी देशमुखांनी म्हटलंय, 'कोणी म्हणाला सोमवारी उपास करावा, कोणी म्हणाला मंगळवारी, असे वषार्चे तीनशे साठ दिवस व्रताचरणातच खर्च होतात.' भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीने पुरुषांना व्रताचरणाच्या त्रासातून बाजूला ठेवण्याचा पक्षपात केला आहे. याबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपली

नाराजी व्यक्त करताना म्हणतात, सर्व सोयी
पुरुषाकरिता । स्त्रियांसाठी सर्व व्यथा।
हे नव्हे शास्त्र आता। द्यावे हाता झुगारोनी ॥

भारतातील आध्यात्मिक प्रचारकांनी आत्मा-परमात्मा, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, यांचं वेदकाळी लादलेलं गाठोडं भारताच्या पर्यावरणात चंद्र-सूर्य असेपर्यंत लादण्याचा निर्धार केला असून त्यापासून ते स्वतःला क्षणभरही दूर करणार नाहीत, ही काळ्या दगडावरील रेघ आहे. या समाज शत्रूंनी असत्य ते सत्य आणि सत्य ते असत्य, अशी शिकवण दिली. उदाहरणार्थ, मानवी देहाचा तिरस्कार केला. तो नश्वर आहे, असं म्हटलं. शरीराला त्रास दिला तर स्वर्ग मिळतो, असं धादांत खोटं न कंटाळता सतत सांगितलं. तुम्ही उपासतापास करून त्रास सहन केला, तर तुमचं रक्षण ईश्वर करील, अशा थापा बेधडकपणे मारल्या. यातूनच व्रतवैकल्यं सांगून बायाबापड्यांवर उपोषणाची सक्ती करणारे सनातनी धीट झाले. श्रावणात पुराणं वाचून भ्रमिष्ट कल्पनांचं दृढीकरण करू लागले. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात. 'व्रत वैकल्यांचा, उपासतापासांचा हा धर्म पुराणांनी प्रसृत केला.' तर लोकहितवादी देशमुख यांनी 'या देशातील स्त्रियांना भट फार फसवतात' असं स्पष्ट म्हटलंय. आज स्त्रिया शिकल्या आहेत. पण जुन्या स्त्रिया आणि आधुनिक स्त्रिया एकसारखंच कर्मकांड करत असतील, तर त्यांच्या शिकण्याला काय अर्थ आहे? कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र शिकवणारी प्राध्यापिका संकष्टीचं व्रत करीत असते, हे चित्र चिंताजनक आहे.

सध्याचे दिवस आरोग्याची उपासना करण्याचे आहेत. महात्मा गांधी आपल्या शरीराची काळजी खूप घेत असत. छत्रपती शाहू तर बालोपासक पैलवानच होते. आपल्या देहाची नासाडी करणाऱ्या व्रत-वैकल्यवेड्यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले सांगतात, 'प्राणीदेह ही रासायनिक समतोल असणारी निसर्गव्यवस्था आहे. शरीराला काय हवं नको ते कळावं, अशी ही व्यवस्था आहे. पण माणसं इंद्रियविजय, धर्माज्ञा (की भटाज्ञा?) मोक्षप्राप्ती, पुण्यसंचय, मनोकामनापूर्तीसाठी अतिरेकीपणे निसर्गनियमांचा भंग करतात; आणि निसर्ग त्यांना शिक्षा आणि दंड करतो.' देवासाठी मरण्याची विकृत इच्छा माणसांच्या मनातून घालवणं, ही शरीरधमार्ची हाक आहे. जगणं हे एक शास्त्र आहे. जीवन ही एक कला आहे आणि जीवनाचा अभ्यास हा खरा जीवनधर्म आहे. आरोग्यपूर्ण, रसरशीत, सळसळतं, चैतन्यपूर्ण, उत्साहाने जीवन कसं जगलं पाहिजे, हे आम्हा भारतीय स्त्री-पुरुषांना एकविसाव्या विज्ञानयुगातही का कळू नये? इतके आपण गचाळ कसे? रामरक्षा म्हणण्याचा परिपाठ काही लोक चालवतात. त्यात शरीराच्या डोक्यापासून पायांपर्यंत उल्लेख आहे. पण मस्तक, कान, नाक, डोळे, तोंड, बाहू, छाती, पोट, मांड्या, पोटऱ्या, पाय यांचं रक्षण दशरथपुत्र राम करत नाही, तर आत्माराम (म्हणजे आपण) करतो. ही नवी रामरक्षा पाठ केल्याशिवाय उपासतापासाच्या अजगरी विळख्यातून आपण सुटू शकणार नाही. तेव्हा-

देह वाहू नका । देवा धर्मा पायी
देहाविण नाही। जगा अर्थ ॥१
आपले मरण। हीच जगबुडी
राखावी ही कुडी। अनमोल ॥२
'उदरभरण । श्रेष्ठ यज्ञकर्म'
शहाण्यांनी वर्म । सांगितले ॥३
जीवनाचा यज्ञ । नासे उपासाने
व्रतवैकल्याने । होतो घात ॥४
'जगा नि जगू द्या' । महावाक्य माना
जपावे जीवना । सर्वांच्याच ॥५
पाप आणि पुण्य। सारे काल्पनिक
स्वर्ग वा नरक। शुद्ध खोटे ॥६
'देवांना जन्माला । घालतो मनुष्य'
नको उपवास। देवांसाठी ॥७
निरोगी शरीर। हेच भाग्य थोर
धमार्चा आजार । ठेवा दूर ॥८

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सप्ताह उत्साहात

मुंबई (कटूसत्य वृत्त):- मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात १ ऑगस्ट रोजी ह्यमहसूल दिनह्न उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत 1 ते 7 ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह आयोजित करण्यात येऊन नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यात आले. मुंबई शहर जिल्हा प्रशासनाने या सप्ताहात नागरिकांना वेळेत, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा पुरविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

महसूल दिन कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी रवी कटकधोंड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद करत प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी सर्वांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे यांनी महसूल दिनाचे महत्त्व स्पष्ट करून महसूल प्रशासनातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

महसूल सप्ताह (1 ते 7 ऑगस्ट) दरम्यान 2 ऑगस्ट रोजी 'स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय' अभियान राबवून कार्यालयातील शाखांची स्वच्छता, दस्तऐवजांचे वर्गीकरण व व्यवस्थापन करण्यात

आले. 3 ऑगस्ट रोजी 'सैनिक हो तुमच्यासाठी' या विशेष उपक्रमांतर्गत माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांना आर्थिक मदत म्हणून धनादेश वितरित करण्यात आले.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत 4 ऑगस्ट रोजी मुंबई शहरात उत्पन्न दाखले, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आयुष्मान कार्ड आदी सेवा देणारी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये प्राप्त अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात आली.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी 5 ऑगस्ट रोजी शिबिर घेण्यात आले. 6 ऑगस्ट रोजी कफ परेड, कुलाबा येथे विशेष शिबिरासोबतच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

गौण खनिज विभागांतर्गत परवान्यांची तपासणी 7 ऑगस्ट रोजी ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. तसेच तृतिय पंथियांच्या अडचणी समजून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

याचबरोबर दिनांक 1 ते 7 ऑगस्ट या महसूल सप्ताह कालावधीत राबविलेले शिबीरांद्वारे तसेच फिरते पथकाद्वारे उत्पन्न दाखला, अधिवास प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्रांबाबत एकूण 2,074 अर्ज प्राप्त झाले असून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आधारकार्ड, शिधापत्रिका, संजय गांधी निराधार योजना लाभ, मतदार नोंदणी व मतदार ओळखपत्र तसेच आरोग्य तपासणीसाठी लवकरच शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवनंदा लंगडापुरे यांनी दिली आहे.

वात्रटिका

औकातीवर आला

खांद्यावर हात पडताच
तो भलताच चेकाळला...
आणि औकात सोडून
सरळ धमकीवर आला...
किती धुतले आणि पळवले
लगेच तो विसरून गेला...
टेरिफ आमच्यावर,प्रेम तुमच्यावर
म्हणून तो बरळून गेला...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

उजनी धरण झाले फुल्ल

पुणे,सोलापूर नगरकरांची चिंताच मिटली

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुणे, सोलापूर आणि नगर जिल्ह्यांसाठी जीवनदायिनी मानलं जाणारं उजनी धरण 100 टक्के क्षमतेने भरलं आहे. पाटबंधारे विभागाने आज सकाळी सहा वाजता दिलेल्या आकडेवारीनुसार, धरणातील पाणीसाठा 116.99 टीएमसीवर पोहोचला होता. टक्केवारीत 99.56 टक्के होता.117 टीएमसी पाणीसाठ्यावर उजनी धरण पूर्ण क्षमतेला पोहोचते. दुपारी तो टप्पा पार करीत उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

उजनी धरण हे नदी आणि कालव्यांच्या माध्यमातून पुणे, सोलापूर आणि नगर जिल्ह्यांसाठी सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे.

गेल्या काही वर्षांत पावसाचे अनियमित प्रमाण, वारंवार पडणारे दुष्काळी सावट आणि वाढत्या पाण्याच्या मागणीमुळे उजनी धरण भरण्यासाठी पूर्ण क्षमता गाठणं अवघड झालं होतं. मात्र यावर्षी पावसाळ्याच्या पहिल्या टप्प्यातच चांगल्या पावसामुळे धरणात जलसाठा जलद गतीने वाढत गेला.

वंचित महिलांना शिधापत्रिकांचे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते वितरण

एकूण 19 लाभार्थी महिलांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने सोलापूर पुरवठा विभागाच्या वतीने समाजातील वंचित घटकांपर्यंत शिधापत्रिकांचा लाभ पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते विधवा, परितक्त्या आणि अनाथ महिलांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित शिधापत्रिका वितरण कार्यक्रमास जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, निरीक्षण अधिकारी प्रफुल्ल नाईक, तसेच सामाजिक कार्यकर्ते नितीन कांबळे उपस्थित होते. यावेळी एकूण 19 लाभार्थी महिलांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.

अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "समाजातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविणे हे आमचे कर्तव्य आहे.

पुरवठा विभागाने या उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले असून, अशा उपक्रमांमुळे प्रशासन आणि समाज यांच्यातील विश्वास दृढ होतो." त्यांनी उपस्थितांना पुढील आठवड्यात विशेष बैठक घेऊन अधिक वंचित लाभार्थ्यांची शिफारस करण्याचे आवाहनही केले.

पुरवठा अधिकारी सरडे यांनी सांगितले की, "अप्पर जिल्हाधिकारी यांचा समाजाभिमुख दृष्टिकोन प्रेरणादायी आहे. या उपक्रमात नितीन कांबळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून त्यांनी गोरगरीब महिलांसाठी सातत्याने पाठपुरावा केला."

जननायक विचारमंच व शिवशक्ती भीमशक्ती ग्राहक संघाचे प्रतिनिधी श्री. नितीन कांबळे यांनीही हा संवेदनशील उपक्रम राबवून विधवा परितक्त्या महिलांना मुख्य प्रवाहात आणले आहे. त्यामुळे असे उपक्रम नियमितपणे होऊन वंचित घटकातील लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

लाभार्थींची नावे:

रेश्मा शेडम, जया चव्हाण, वर्णा वाघमारे, पूजा पेद्दी, प्राजक्ता कांबळे, अंबिका देवकते, गायत्री विटकर, शशिकला देवकरे, अलका मेलगिरी, पूजा चव्हाण, मंगल लोंढे, लानुबाई दुपारगुडे, दिलशाद शेख, तहेरा बक्षी, रेश्मा शेख, शामल रणदिवे, विमलाबाई कांबळे, नौशाद बी. कातनकर, कल्याणी रमेजा.

22 व्या राज्य बालनाट्य स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर

31 ऑगस्टपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याचे आवाहन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित 22 व्या राज्य बालनाट्य स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, स्पर्धेसाठी ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत 31 ऑगस्ट 2025 निश्चित करण्यात आली आहे.

स्पर्धेचा शुभारंभ ३ नोव्हेंबर 2025 रोजी होणार असून, प्राथमिक फेरी डिसेंबर महिन्यात राज्यातील 10 केंद्रांवर पार पडणार आहे.

या स्पर्धेसाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, तसेच नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे.

विद्यार्थ्यांनी https://mahanatyaspardha.com या संकेतस्थळावर प्रवेशिका ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री. सागर नन्नवरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

स्पर्धेच्या विविध टप्प्यांमध्ये सहभागी विद्यार्थी आपल्या अभिनय, संवाद कौशल्य आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचे दर्शन घडविणार आहेत. शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर न केल्यास प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. तसेच शासन नियमांचे पालन बंधनकारक असून, उल्लंघन केल्यास संबंधित विद्यार्थ्याला अपात्र ठरविण्यात येईल, असे आदिवासी विकास आयुक्तालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये उपजत कलागुण असतात. त्यांना योग्य संधी दिल्यास आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलाकार घडू शकतात. राज्य बालनाट्य स्पर्धेच्या माध्यमातून त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत असून, सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील सर्व पात्र शाळांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय विभागाचा तसेच अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या प्रगतीचा निधी इतरत्र न वळवता बजेटचा कायदा करण्यात यावा- प्रमोद शिंदे

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- सामाजिक न्याय विभागाचा तसेच अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या प्रगतीचा निधी इतरत्र न वळवता त्यासाठी बजेटचा कायदा करण्यात यावा या संदभार्ची मागणी महाराष्ट्र परिवार व एन डी एम जे राज्य प्रसिद्धीप्रमुख प्रमोद शिंदे यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे सोलापूर दौऱ्यावर आले असताअनुसूचित जाती जमातीच्या प्रगतीसाठी सामाजिक न्याय विभागाकडे निधी उपलब्ध करून दिला जातो परंतु हा निधी अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या प्रगतसाठी न वापरता इतर कारणांसाठी वळवला जातो त्यामुळे अनुसूचित जाती जमातीच्या प्रगतीमध्ये अडथळा येत आहे. सतत नेहमी महाराष्ट्र शासनाकडून कोणत्या ना कोणत्या कारणावरून अनुसूचित जाती जमातीचा दरवर्षी कोट्यावधींचा निधी इतरत्र वळवला जातो मागच्या आठवड्यात सुद्धा लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यावधींचा निधी वळवला गेला आहे. तो निधी पुन्हा अनुसूचित जाती जमातीच्या प्रगतीसाठी वापरण्यात यावा व लाडक्या बहिणीसाठी स्वतंत्र निधीची उभारणी करण्यात यावी.सामाजिक न्याय विभागा मधील निधी इतर ठिकाण वळवून अनुसूचित जाती जमाती च्या लोकांवर शासनाकडून अन्याय केला जात आहे.

हा अन्याय रोखण्यासाठी शासनाने बजेटचा कायदा पारित केला पाहिजे जेणेकरून सामाजिक न्याय विभागाचा निधी इतर कोणत्याही ठिकाणी वळवता येणार नाही. असं न केल्यास भविष्यात आपणास अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या आरोशास मोर जावे लागेल. पण सामाजिक न्याय मंत्री असल्याकारणाने या गोष्टीची गंभीर दखल घेऊन तात्काळ बजेटचा कायदा करून अनुसूचित जाती जमातीच्या हक्काचा निधी इतर ठिकाणी न वळवता तो फक्त अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या प्रगतीसाठीच वापरण्यात यावा अन्यथा भविष्यात तीव्र प्रकारचे आंदोलन छेडण्यात येईल अशा प्रकारचे निवेदन प्रत्यक्षात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांना भेटून दिले यावेळी, सर्व रोजगार हमी व फलोउत्पादन मंत्री भरत शेठ गोगावले, आ.उत्तमराव जानकर,आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील, मा आमदार रामभाऊ सातपुते, तसेच मोठ्या प्रमाणात इतर पक्ष संघटना पदाधिकारी उपस्थित होते.

माजी सैनिक, पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार' अर्ज प्रक्रिया सुरू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार' देण्यात येणार असून, इच्छुकांनी २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि.) यांनी केले आहे.

पुरस्कारासाठी पात्रता:

- राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व पुरस्कार विजेते
- साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, संगणक, उद्योजकता व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
- देश-राज्याची प्रतिष्ठा वाढवणारे योगदान
- शैक्षणिक क्षेत्रात १०वीत ९०%, १२वीत ८५% पेक्षा अधिक गुण, पदवी/पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक, IIT/IIM/AIIMS प्रवेशित विद्यार्थी

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे:

- वैयक्तिक अर्ज
- विहित नमुन्याचा फॉर्म (डी. डी. ४०) झ्र कार्यालयात उपलब्ध
- बोनाफाईड दाखला
- मार्कशीटची प्रमाणित प्रत
- ओळखपत्राची छायांकित प्रत
- डिसचार्ज बुकमधील फॅमिली डिटेल पानाची झेरॉक्स
- बँक पासबुकची पहिल्या पानाची प्रत
- आधार कार्ड प्रत
- कार्याची पुष्टी करणारी प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील प्रसिद्धी, फोटो इ.

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:

२४ सप्टेंबर २०२५ - त्यानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

अधिक माहितीसाठी संपर्क: जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर दूरध्वनी: ०२१७-२९९२३६६

आपत्तीत आपदा मित्र-सखींची भूमिका महत्त्वाची : शक्तीसागर ढोले

'पंढरपूर येथील भिमा नदीत वाहून जाणाऱ्या व्यक्तींना वाचवण्यासाठी मी पूर्वी प्रयत्न केले होते. तेव्हा कोणतेही प्रशिक्षण नव्हते. आता शास्त्रीय पद्धती समजल्यामुळे स्वतःला सुरक्षित ठेवत इतरांचा जीव वाचवू शकतो, याचा आत्मविश्वास आला आहे.'
गणेश कांबळे, प्रशिक्षणार्थी आपदा मित्र-सखी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- 'नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अडकलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करताना प्रशिक्षित व्यक्तींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. योग्य माहिती, योग्य व्यक्तीला, योग्य वेळी पोहोचवणे हेच आपत्ती व्यवस्थापनाचे मूलभूत सूत्र आहे,' असे प्रतिपादन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, सोलापूर यांच्या वतीने बारा दिवसीय 'आपदा मित्र-सखी' प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, हे प्रशिक्षण आयटस स्पोर्ट्स सेफ्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे सुरू आहे.

या प्रशिक्षणात होडी चालक-मालक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, आशा वर्कर्स, महाविद्यालयीन युवक-युवती अशा विविध स्तरातील स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला आहे. प्रशिक्षणामध्ये आपत्तीची ओळख, आपत्तीचे प्रकार, उढफ़ जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवणे, स्ट्रेचर तयार करणे, प्राथमिक उपचार, प्रशासनाशी संपर्क, गर्दी नियंत्रण, पुरात बचाव कार्य, बोट हाताळणी, डोंगराळ भागातील बचावासाठी दोरीचा वापर, गाठी बांधणी यासारख्या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दिली जात आहेत.

प्रशिक्षणाचे समन्वयन इंडियन रेस्क्यू अकॅडमीचे फैय्याज मुलाणी, प्रशिक्षक प्रशांत शेंडे, प्रदीप ऐनापुरे आणि मोनिका शिंपी हे करत आहेत. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या आपदा मित्र-सखी यांना प्रमाणपत्र व सुरक्षा कीट देण्यात येणार आहे.

बार्शी नगरपरिषद, बार्शी

(पाणी पुरवठा विभाग)

जा.क्र.बानप/पापु-१८/प्रशा-३/४१०५ दिनांक : ११/०८/२०२५

जाहीर ई-निविदा सुचना क्र.०३
सन २०२५-२०२६

Main portal : http://mahatenders.gov.in

बार्शी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील योग्य त्या नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांच्याकडून सहा बाबनिहाय दराच्या ई निविदा विहीत नमुन्यात मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर निविदेचे विस्तृत नमुने महाराष्ट्र शासनाच्या Main Portal: http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) दिनांक ११/०८/२०२५ पासुन उपलब्ध आहेत. बयाणा रक्कम व टेंडर फॉर्म फी नेट बँकिंग पध्दतीने स्वीकारली जाईल. मागविण्यात आलेल्या निविदेची कागदपत्रे अटी व शर्ती प्रमाणे अपलोड करणे बंधनकारक आहेत. जर अटी व शर्तीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता न झालेस आपली निविदा उघडण्यात येणार नाही. तसेच मागविण्यात आलेल्या कामाची कमी अथवा जादा दराची निविदा मंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
मुख्याधिकारी
बार्शी नगरपरिषद, बार्शी

राजकुमार हिवरकर पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

अकलूज एसटी डेपोला नवीन १० लालपरी

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- शिवसेनेचे ओबीसीचे जिल्हा प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी १५ फेबुवारी २०२५ रोजी

महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून

अकलूज बस डेपो साठी २० एसटी बसची मागणी केली होती त्या मागणीला यश आले असुन अकलूज एसटी डेपोला सध्या तरी नवीन १० लालपरी एस बस मिळाल्या असुन त्या बसचे पूजन शिवसेना ओबीसीचे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले यावेळी शिवसेनेचे नेते पदाधिकारी त्याचबरोबर ज्यांच्या जीवावर एसटी महामंडळाच्या अकलूज बस डेपोची धुरा आहे असे सर्व कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते.अकलूज बस डेपोच्या ताब्यात दहा नवीन एसटी बस दाखल करून दिल्याबद्दल शिवसेना ओबीसीचे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी महायुती सरकारचे विशेषता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, रोजगार हमी मंत्री भरत शेठ गोगावले यांचे आभार मानले. व उर्वरित राहिलेले १० बसेस लवकरात लवकर अकलूज डेपोसाठी मिळाव्या यासाठी विनंती केली आहे.

> अकलूज बस डेपोच्या जुन्या झालेल्या जवळपास ४० बसेस आहेत पूर्वी त्या १०० वर होत्या बस ची संख्या कमी झाल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी खेड्या गावावरून येण्यास तसेच हॉस्पिटलच्या निमित्ताने जाणाऱ्या महिलांची संख्या खूप मोठी आसल्याने अडचण निर्माण झालेली होती. त्याचबरोबर माळशिरस तालुक्याच्या जवळ पंढरपूर,तीर्थक्षेत्र अक्कलकोट, गोंदावले, शिर्डी, शिखर शिंगणापूर, शनिशिंगणापूर, नाशिक, त्रिंबकेश्वर,आधी धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी नागरिकांना उपलब्ध नसल्याने यापूर्वी जाणे शक्य होत नव्हतं सदर निवेदनाचा विचार सकारात्मक व तात्काळ करून भरत शेठ गोगावले मंत्री रोजगार हमी पणन यांच्या माध्यमातून राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ दहा बस पाठवून उर्वरित दहा बस द्याव्या याबाबतची विनंती मंत्री महोदयांकडे पुन्हा करण्यात आली.
> राजकुमार हिवरकर पाटील

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रो.प्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे

उभे शब्द : १) राष्ट्रवादीचे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते २) महाराष्ट्रातील एक जिल्हा, या जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहते ३) माकड ४) स्वभावाने रागीट ५) क्रिकेटमधील फलंदाजाच्या हातातील लाकडी फळी (इंग्रजीत) ६) मिरच्या व गरम मसाला वापरून बनविलेले तिखट ९) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुटर घुं करणारा पक्षी १३) आर्थिक व्यवहारात केलेला घोटाळा १५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) १७) उत्तरप्रदेश संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** १९) घर (हिंदीत) २०) तिखट न टाकता डाळीचे बनविलेले कालवण २१) मनसे अध्यक्ष-** ठाकरे २३) फसवणूक करणारा २५) झुणका बनविण्यासाठी केलेले डाळीचे पीठ-*** पीठ २७) आवकच्या विरूध्दार्थी २८) रोख ३०) स्वत:वरील विश्वास, सचिन पिळगावकरचा एक चित्रपट ३२) दैत्य, राक्षस ३४) पुष्कळ, भरपूर ३५) धातूचा बारीक तंतू ३६) अध्ययन, रिडिंग (मराठीत) ३७) लिंबूपाण्याचे पेय ३३) सूर्य ३९) गंध, परीमळ ४१) मुंबईतील प्रमुख रेल्वे स्टेशन ४३) एक दुग्ध पेय ४५) सहा गुणिले दोन

आडवे शब्द : १) यात्रेनिमित्त देवाची वाजतगाजत काढलेली मिरवणूक ३) पश्चिम बंगालच्या महिला मुख्यमंत्री ७) खा. अमोल कोल्हे यांचा लोकसभा मतदारसंघ ८) वर्गातील मुलांची एकूण संख्या ९) बोल्टचा जोडीदार, अभिनेता १०) जवळ, समीप ११) कपडे वा मौल्यवान वस्तू ठेवण्याची मोठी पेटी १३) पायात चप्पल न घालता चालणे १४) हॉटेलमधील नोकर १५) खडबडीत (इंग्रजीत) १६) सीताहरण प्रसंगी रावणाशी लढा देणारा मोठा पक्षी १८) एक सद्गुरू-***** पै २२) धान्याचे केलेले बारीक चूर्ण २४) पटाईत, पारंगत २६) शिवसेनेचे मुंबईतील एक नेते-**** किर्तीकर २९) कोकणात आढळणारे वरून काटेरी पण आत गोड गरे असणारे मोठे फळ ३०) चार दुणे ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३२) दरवाजा ३३) फायदा, लाभ ३५) शक्तीमान, ताकद असलेला ३८) शासकीय कार्यालयीन सुट्टीचा वार ४०) स्वादिष्ट, रूचकर ४२) एकमेकाबद्दल असलेली खात्री, हमी ४३) एक म्हण-*** तोंडी मोठा घास ४४) शब्दाला असलेले वजन, दरारा ४६) दोरी ४७) श्रीरामाचा एक बंधू, कैकयी पुत्र

सुडोकु - 23

		2	8		1	3	4	9
8				7	3	2	5	
		4				8	7	
	9	7				1	3	2
1				3				
5	8	3		1	9			
9			5	6				7
6	7	8	3			9	1	
							8	3

भाजपतर्फे हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येणार - चेतनसिंह केदार-सावंत

सांगोला (कटूसत्य वृत्त):- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमामध्ये हर घर तिरंगा अभियान साजरा करण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार भाजपतर्फे १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा हे अभियान मोठ्या उत्साहात साजरे केले जाणार आहे. क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या अभियानातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना त्यांच्या घरावर तिरंगा लावण्यासाठी प्रेरित करण्याचा संकल्प भाजपच्या वतीने करण्यात आला आहे. देशप्रेमाचे वातावरण निर्माण होण्यासाठी, देशप्रेमाची भावना जागृत होण्यासाठी ९ ऑगस्टच्या क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक लोकसहभागासाठी बूथ स्तरापर्यंतचे कार्यकर्ते जनजागृतीवर भर देणार आहेत. शाळा, महाविद्यालयांशी संपर्क साधून ध्वजारोहणासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

११ ते १४ ऑगस्ट या काळात पक्ष संघटनेच्या प्रत्येक मंडलात तिरंगा यात्रा होणार आहेत. १२ ते १४ ऑगस्ट दरम्यान महापुरुषांचे स्मारक, पुतळा परिसर, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारक परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे. देशभक्तीपर गीत, तिरंगा यात्रा, मेळावे, सार्वजनिक ठिकाणी होर्डिंग लावून देशभक्तीचा प्रचार व वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. १४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका दिवस साजरा करण्यात येणार आहे. घरोघरी तिरंगा फडकवणे, महापुरुषांच्या स्मारक, पुतळ्यांची स्वच्छता, फाळणी विभीषिका स्मृतिदिन अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने अकलुज येथे भव्य आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन

अकलूज (कटूसत्य वृत्त):- प्रताप क्रीडा मंडळ शंकर नगर अकलूज यांच्या वतीने रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल अकलूज येथे भव्य राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली. मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९७८ पासून कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या प्रताप क्रीडा मंडळाने राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, बालक्रीडा स्पर्धा, समूहनृत्य स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, रत्नाई मिठाई वाटप, रक्तदान शिबीर असे अनेक

उपक्रम राबवले आहेत. याही वर्षी सालाबाद प्रमाणे दि. १७ ऑगस्ट रोजी भव्य राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यास्पर्धेस राज्यातील मुंबई, उस्मानाबाद, पंढरपूर, माढा, सांगोला, मंगळवेढा, करमाळा यासह विविध भागातील अनेक संघ सहभागी होतील. या स्पधेर्साठी एकुण १ लाख ३० हजार रु.ची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये प्रथम क्रमांकास ४४ हजार रु, द्वितीय क्रमांकास ३३ हजार रु, तृतीय क्रमांकास २२ हजार रु, चतुर्थ क्रमांकास ११ हजार रु व सन्मानचिन्ह , तर उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या ४ संघास प्रत्येकी ५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना मंडळाच्या वतीने भोजनाची सुविधा देण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी ९८६०३३१७१७/ ९ ३ २ ५ २ ५ २ ९ ९ ६ / ९४२०७८२३२३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाचे सचिव बिभीषण जाधव यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, स्पर्धा प्रमुख भीमाशंकर पाटील, यशवंत माने देशमुख, बाळासाहेब सावंत, सुभाष चव्हाण यांचे सह सर्व संचालक व सदस्य उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयाचे सोलापूर येथे खंडपीठ स्थापन व्हावे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मुंबई उच्च न्यायालयाचे सोलापूर येथे खंडपीठ होण्यासाठी सोलापूर येथे अत्यंत महत्त्वाची बैठक संपन्न बैठक सोलापूरच्या न्याय क्षेत्रात माईलस्टोन ठरेल

सोलापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे सोलापूर येथे खंडपीठ स्थापन व्हावे यासाठी शनिवारी शासकीय विश्रामगृह मध्ये सोलापूर मधील प्रसिद्ध वकील मंडळी, वेक अप सोलापूर फौडेशन, सोलापूर विकास मंच, गिरीकर्णिका फौडेशन या संघटनेचे अध्यक्ष व विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत सदर मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सोलापूर येथे स्थापन व्हावे यासाठी मुंबई उच्च न्यायालय सोलापूर खंडपीठ कृती स्थापन करण्यात आली आहे,सदर कृती समिती तर्फे येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री मा ना जयकुमार गोरे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन देण्यात येणार आहे तसेच जिल्ह्यातील सर्व मा.आमदार व मा खासदार, ग्रामपंचायत सरपंच यांना खंडपीठ व्हावे यासाठी निवेदन देण्यात येणार आहे.तसेच यासाठी आता मोठा लढा उभा करण्याचा निर्णय घेतला आहे,तसेच सदर कोल्हापूर येथे जे खंडपीठ स्थापन करण्यात आले आहे यासाठी आमचा विरोध नाही हे आज झालेल्या बैठकीत मान्यवरांकडून माहिती देण्यात आली .तसेच सोलापुरात खंडपीठ व्हावे यासाठी सोलापूर शेजारील धाराशिव,लातुर जिल्हा ने सोलापूर येथे खंडपीठ व्हावे यासाठी पाठिंबा दिला आहे, तसेच सोलापूर जिल्हा मधील सर्व तालुका व शहर स्तरावरील सर्व वकीलांची एक बैठक सुद्धा मंगळवारी रोजी घेण्याचे प्रयोजन आहे हे सुद्धा आजच्या बैठकीत अंतिम करण्यात आले आहे.

सदर आजच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान वेक अप सोलापूर फौडेशन चे संस्थापक अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी भुषविले व सविस्तर पुढील. कृती समितीचा आराखडा व नियोजन विषद केले.

यावेळी सदर बैठकीत ॲड खतीब वकील, वकील बार असोसिएशन चे माजी अध्यक्ष ॲड शिवशंकर घोडके, विकास मंच चे योगिन गुर्जर एडवोकेट राजन दीक्षित, एडवोकेट केशव इंगळे, दैनिक कटूसत्य चे संपादक पांडुरंग सुरवसे यांनी आपले अत्यंत महत्त्वाचे मनोगत व्यक्त केले. तसेच गिरीकर्णिका फौडेशन चे अध्यक्ष मा विजय जाधव, एमबीए संघटनेचे अध्यक्ष रुपेश इंगळे , सामाजिक कार्यकर्ते आनंद पाटील, एडवोकेट राजेश देशपांडे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष आप्पा कन्नुरकर , सामाजिक कार्यकर्ते गणेश शिलेदार हजर होते .सदर बैठक ही नक्कीच पुढी.सोलापूर च्या न्याय क्षेत्रातील माईलस्टोन ठरेल हे नक्कीच.

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणात सामाजिक बांधिलकीचा संदेश

तंबाखू व्यसनमुक्तीचा अनोखा राखी उपक्रम

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने महाराष्ट्र एज्युकेशन हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालय, विजापूर रोड येथे सुरू असलेल्या जिल्हास्तरीय आपदा मित्र प्रशिक्षणात सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला.

एक राखी तंबाखू व्यसनमुक्तीची या नावाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर व्यसनमुक्ततेचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात सारथी युथ फाउंडेशनच्या सहकार्याने प्रशिक्षणार्थींना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीजनक परिस्थितीची जाणीव करून देण्यात आली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात सारथी युथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'आपत्तीच्या काळात व्यसन करणाऱ्या व्यक्तींना सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक असतात. व्यसनमुक्त राहून आपत्ती टाळता येते, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.'

रक्षाबंधनाच्या अनुषंगाने कामगार वसाहतीतील युवतींनी स्वतः तयार केलेल्या राख्या प्रशिक्षणार्थींना बांधल्या. राखी बांधताना त्यांनी आपण तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन करू नये आणि इतरांनाही करू देऊ नये' अशी ओवाळणी मागितली. या अनोख्या उपक्रमाने प्रशिक्षणाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाली.

कार्यक्रमात प्रशिक्षक प्रदिप ऐनापुरे, सारथी युथ फाउंडेशनचे कोअर कमिटी सदस्य प्रसाद अतनुरकर उपस्थित होते.

प्रशासनाचा दृष्टिकोन

'आपत्तीच्या कालावधीमध्ये व्यसनमुक्त राहणं अत्यंत गरजेचं आहे. बचाव कार्य करताना सामाजिक बांधिलकी जपण्याची संधी मिळते, ती जपली पाहिजे.'

शक्तीसागर ढोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी

प्रशिक्षणार्थींची प्रतिक्रिया

एक राखी तंबाखू व्यसनमुक्तीची हा उपक्रम खूप छान वाटला. वेगळ्या प्रकारचा रक्षाबंधन साजरा झाला. मी स्वतः व्यसनमुक्त राहिन आणि इतरांनाही व्यसनमुक्त राहण्यास प्रेरित करीन.

सुरज कांबळे, प्रशिक्षणार्थी आपदा मित्र

जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते पडसाळी पंपगृह पूजन करून उद्घाटन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प योजना क्रमांक दोन अंतर्गत पडसाळी येथे उभारण्यात येणाऱ्या पंपगृहाचे पूजन व उद्घाटन जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पंपगृहाच्या कामाची सखोल माहिती घेऊन पाहणी केली. या प्रसंगी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे उपाध्यक्ष तथा आमदार राणा जगजीतसिंह पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता थोरात, कार्यकारी अभियंता अमोल नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. मंत्री विखे पाटील यांनी प्रथम सिंचन

प्रकल्पाच्या कामांची सविस्तर पाहणी केली. कृष्णा मराठवाडा योजनेतील टप्पा क्रमांक दोन अंतर्गत पडसाळी येथे उभारण्यात येणाऱ्या पंपगृहाचे पूजन विधिवत पार पडले. यानंतर प्रकल्पाच्या कार्यपद्धती, प्रगती आणि भविष्यातील लाभधारक क्षेत्राचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पामुळे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्थिर व भरपूर पाणी मिळणार असून, शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे.

सुरक्षेच्या देवदूतांना राखी बांधून सन्मान-लक्ष्मी-आनंद विद्यालयाचा आगळा-वेगळा उपक्रम

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित, लक्ष्मी- आनंद विद्यामंदिर व ज्यु.कॉलेज मधील विद्यार्थिनींनी रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने आपले रक्षण करणाऱ्या टेंभुर्णी पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस बांधवांना राखी बांधून हा उत्सव साजरा केला. सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्यांस अनुसरून नेहमीच तत्पर असलेले पोलीस

खरे बांधव असतात. म्हणूनच याच कृतज्ञतेने विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना राखी बांधून हा अनोखा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला. यावेळी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.नारायणजी पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते म्हणाले की, आम्ही कायम आपल्या सोबत आहोत. मुलींनी समाजामध्ये निर्भयपणे वागले पाहीजे, उतुंग यश संपादन केले पाहिजे. अशा आशयाचा ठाम विश्वास या निमित्ताने त्यांनी व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व टेंभुर्णी सरपंच सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच संस्थेच्या संचालिका शाहिदा पठाण, प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे, प्रा.युवराज वजाळे,सहशिक्षिका गायत्री शहाणे व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

धारदार शस्त्र बाळगुण गावामध्ये दहशत माजवणारे आरोपी नातेपुते पोलिसांच्या ताब्यात

नातेपुते(कटूसत्य वृत्त):- मौजे फोंडशिरस तालुका माळशिरस येथील उमाजी नाईक चौकात ओंकार राजेंद्र गोरे वय-२० वर्षे , रोहित शंकर पारसे वय-२० वर्षे दोघे रा फोंडशिरस ता माळशिरस हे दोघे हातात धारदार शस्त्र घेऊन दहशत माजवत असल्याची माहिती नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांना मिळताच वरील आरोपी ओंकार गोरे रोहित पारसे यांना नातेपुते पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती नुसार शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी नातेपुते पोलीस ठाणे हद्दीमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना ओंकार राजेंद्र गोरे वय-२० वर्षे , रोहित शंकर पारसे वय-२० वर्षे दोघे रा फोंडशिरस ता माळशिरस हे हातात धारदार शस्त्र घेऊन फोंडशिरस येथील उमाजी नाईक चौकात दहशत माजवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असता नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी महारुद्र परजणे यांच्या आदेशान्वये पोलीस नाईक राकेश लोहार, पोलीस कॉन्स्टेबल असलम शेख, रणजीत मदने ,अमोल बंदूके, राहुल वाघमोडे, नवनाथ चव्हाण यांनी सदर ठिकाणी सरकारी वाहनाने जाऊन राजेंद्र गोरे व रोहित पारसे यांना गराडा घातला. व राजेंद्र गोरे यांच्या हातात एक मोठी लोखंडी मुठ व पाते असले तलवार, तसेच एक लोखंडी मुठ असलेला वाकडा कोयता मिळुन आला व रोहित शंकर पारसे याचे हातात लाकडी मुठ असलेली लोखंडी कुकरी व लोखंडी मुठ असलेला रामपुरी चाकु असे धारधार शस्त्रे सदर इसमांचे हात मिळुन आल्याने ते शस्त्रे पोलीस नाईक राकेश लोहार यांनी जप्त करून वरील पोलीस कर्मचाऱ्यांनी त्या दोघांना ताब्यात घेतले.पोलीस कॉन्स्टेबल अमोल ज्ञानेश्वर बंदुके पोलीस अंमलदार नातेपुते पोलीस ठाणे यांचे फियार्दीवरुन नातेपुते पोलीस ठाणेस शस्त्र अधिनयिम १९५९ चे कलम ४ व २५ प्रमाणे आरोपी राजेंद्र गोरे व रोहित पारसे गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्यात आले सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी,अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर अकलुज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, पो.हे.कॉ. बाबर, पो.ना. राकेश लोहार, निलेश बल्लाळ, पो.कॉ. अमोल बंदुके, पो.कॉ. अस्लम शेख, रणजित मदने, राहुल वाघमोडे यांनी केली.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक राकेश लोहार करीत आहेत.

नातेपुते व परिसरात जर कुणी बेकायदेशीर अग्नि शस्त्र किंवा धारदार शस्त्र बाळगून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्याची तात्काळ माहिती नातेपुते पोलीस ठाणे येथे द्यावी असे आव्हान नातेपुते व परिसरातील नागरिकांना पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात येत आहे तसेच बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर गंभीर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात रोज ४० जनावरांना 'लम्पी स्कीन'ची बाधा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यात आतापर्यंत एक हजार ८५४ लम्पीबाधित जनावरे आढळली आहेत. त्यातील एक हजार ३८० जनावरे बरे झाले आहेत. जनावरे बरे होण्याचे प्रमाण चांगले असले तरी रोज जिल्ह्यात ३० ते ४० लम्पीबाधित जनावरांची भर पडत आहे. तर ५४ जनावरांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पशुपालकांनी गोवर्गीय जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाने केले आहे.

जिल्ह्यात लम्पीची साथ असून संसर्ग रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने संपूर्ण जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित

केले आहे. तर पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. जिल्ह्यात सात लाख ७४ हजार गोवर्गीय जनावरे आहेत. त्या तुलनेत सध्याची लम्पीबाधित जनावरांची संख्या नगण्य आहे.

मात्र, जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांतून रोज ३० ते ४० लम्पीबाधित जनावरे आढळत आहेत. तर ४१५ सक्रिय लम्पीबाधित जनावरे आहेत.

यामुळे पशुपालकांनी गोवर्गीय जनावरांची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तसेच उपाययोजना करतानाच नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधण्याची आवश्यकता असल्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाकडून सांगण्यात आले.

सेसमधून एक लाख ९० हजार लसी उपलब्ध

जिल्हा परिषदेने सेसमधून एक लाख ९० हजार ४०० लसी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या गुरुवारी (ता. ७) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाला प्राप्त झाल्या असून त्यांचे पंचायत समिती स्तरावर तातडीने वितरण करण्यात येणार आहे. आजारी नसलेल्या जनावरांना लसीकरण केले जाणार असल्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाने सांगितले.सोलापूरजिल्ह्यातील सर्वच तालुक्यांत रोज ३० ते ४० लम्पीबाधित जनावरे आढळत आहेत.

जनावरे बरे होण्याचे प्रमाण चांगले आहे. सोलापूर शहरातील मोकाट जनावरांना लम्पीची लागण झाल्याचे आढळल्यावर त्यांच्या विलगीकरणाची महापालिकेने सोय केली आहे. मात्र, लम्पीची लागण झालेली गोवर्गीय जनावरे मोकाट सोडू नये. पशुपालकांनी उपाययोजना करतानाच जनावरांवर उपचार करून घ्यावेत.

हरवले आहे

शनिवार पेठ येथून फाईव्ह स्टार हॉटेल सिद्धेश्वर पेठ येथे जात असताना वाटेत काही मूळ दस्तऐवज ठेवलेली पिशवी घहाळ झाली असून त्यामधील कागदपत्रांचा मजकूर खालील प्रमाणे.

पुणे गृहनिर्माण संस्था क्षेत्र विकास मंडळ पुणे मधील जुना सर्वे नंबर 312 नवीन सर्वे नंबर 130 पैकी लेआउट 23/89 पैकी जुळे सोलापूर भाग एक मधील अर्ज क्रमांक 1535 सोडत क्रमांक 236 भूखंड क्रमांक 132 या भूखंडाचे मूळ दस्त हरवले असून कोणास सापडल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर वरील नमूद दस्तावेज आणून द्यावे ही नम्र विनंती.

ॲड सय्यद मोहम्मद इलियास मोहम्मद अय्युब
226 शनिवार पेठ सोलापूर.
मो-8329277363

ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

टेंडर नोटीस

१५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ ते २०२४-२५ मंजूर कामांची पेपर निविदा करणे

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	टेंडर फॉर्म फी	कामाची मुदत	ठेकेदार वर्ग
१)	प्रभाग ५ दत्तनगर येथे १) भुमिगत गटार दुरुस्ती करणे २) RCC पाईप भुमिगत गटार बांधणे.	९,४७,२४१/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
२)	प्रभाग ५ दत्तनगर भागात १) जि.प.शाळेजवळ, अंजना नगर, दत्तनगर येथे आवश्यक ठिकाणी रिबोर मोटार,पाणीटाकी बसविणे २) दत्तनगर येथे पाणीपुरवठा दुरुस्ती.	८,२१,७४६/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
३)	१) ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे. २) भारत आबा शिंदे वाचनालय दत्तनगर येथे दुरुस्ती करणे.	५,१८,५००/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
४)	प्रभाग ५ दत्तनगर येथील गणेश मंदिर परिसर, बौद्ध वस्ती, अंगणवाडी-१ परिसर भागात मुरुमीकरण करणे	२,७०,०००/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
५)	जि.प.शाळा नं.१ शौचालयासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे.	२,२५,०००/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.१२/०८/२०२५ ते दि.१३/०८/२०२५ सुट्टीचे दिवस वगळून सायं ५.०० वा पर्यंत २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.१६/०८/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.१८/०८/२०२५ रोजी दु.०२.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा,जि.सोलापूर

जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ११९/२०२५ नि.६

सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मे.कंखरे सो यांच्या कोर्टात,

१ श्रीमती शांताबाई महादेव सुरेकर
वय- ५८ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
रा. सिद्धार्थ नगर,१०,कुमठे दक्षिण सोलापूर, सोलापूर
२ शंकर महादेव सुरेकर
वय- ५१ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा.कुमठे,दक्षिण सोलापूर,टिकेकरवाडी,
दक्षिण सोलापूर, सोलापूर
३ श्रीराम महादेव सुरेकर
वय- ४० वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा.३०२,घर नं.००९७/४,
प्रगती निवास बिल्डिंग, समर्थ नगर प्रकाश जनरल स्टोअर जवळ घनसोळी, नवी मुंबई, ठाणे सध्या. कुमठेगांव, दक्षिण सोलापूर, सोलापूर
}अर्जदार

विरुध्द

कोणी नाही
}सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील महादेव लायप्पा सुरेकर हे दिनांक ०४/०९/२०१८ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत महादेव लायप्पा सुरेकर यांचे मृत्युपश्चात डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका शहर हद्दवाढ विभागातील ५४ पेठ, कुमठा गाव, मागास वर्गीय गावठाण मधील प्लॉट नं. ३४ याचे क्षेत्र १४X२६=३६४ चौरस फूट घरजागा आहे. यांसी सो.म.पा. मिळकत क्र. ५४३०१५ असे असून यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे-पूर्वेस :दाबेकर यांची मिळकत, पश्चिमेस : वाघमारे यांची मिळकत उत्तरेस: रस्ता, दक्षिणेस: हिंदु स्मशानभुमी. सदर जागेवर मयत महादेव लायप्पा सुरेकर यांचे नांव सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद असून मयताचे नाव कमी करून अर्जदार यांच्या नावाची नोंद सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयामध्ये लावण्यासाठी आवश्यक असलेले वारस प्रमाणपत्र (Heir-ship Certificate) मिळण्याकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली दि. १८/९ /२०२५ रोजी स्वत: अथवा आपल्या वकिलामार्फत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह या मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. नमूद मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदरचे मे.कोर्ट अर्जदार यांचे नावे हेअरशिप सर्टिफिकेट देणेचा हुकूम करेल त्यानंतर कोणाची काही हरकत चालणार नाही. असे. हे आज दि. १२ /८ /२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिद्धी केले

हुकूमावरुन
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,सोलापूर.

क.लिपिक शिक्का

जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ५६८/२०२५ नि.६

सोलापूर येथील मे.सिव्हील जज सीनियर डिव्हिजन मे.कंखरे सो यांच्या कोर्टात,

१) यशोदा अंजय्या पुलगम
वय: ५७ वर्षे, धंदा: बिडीकाम
२) श्रीनिवास अंजय्या पुलगम
वय: ३३ वर्षे, धंदा व्यापार
३) सौ. स्वाती व्यंकटेश मंचीकटला
वय: ३६ वर्षे, धंदा: बिडीकाम
दोघे रा.४३३,निलम नगर,एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर
४) सौ. उमा अंबादास वग्गू
वय: ३२ वर्षे, धंदा: कामगार
रा. १८, न्यु सुनिल नगर, एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर
५) व्यंकटेश प्रभाकर पुलगम
वय: २७ वर्षे, धंदा: व्यापार
रा. ४६९, निलम नगर, एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर
६) सौ. उमा गणेश कटकम
वय - ३० वर्षे, धंदा- बिडीकाम
रा. ३८, साईबाबा चौक, अशोक चौक, दाजी पेठ, सोलापूर
७) सौ. महेश्वरी श्रीनिवास सोमा
वय- २२ वर्षे, धंदा- बिडीकाम
रा. २९८, थोबडे नगर, एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर
}अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही.
}सामनेवाला

वर नमुद मिळकत ही मयत राधाबाई बाबण्णा पुलगम यांचे मालकीची असून त्यांचे दि.०१/०३/२०१२ रोजी सोलापूर येथे निधन झाले आहे. तसेच मयत राधाबाई बाबण्णा पुलगम यांचा पहिला मुलगा अंजय्या बाबण्णा पुलगम यांचे दि. २८/०७/२००८ रोजी मृत्यु झालेला आहे. तसेच दुसरा मुलगा प्रभाकर बाबण्णा पुलगम यांचे दि.१७/०२/२००९ रोजी मृत्यु झालेला आहे. तसेच प्रभाकर बाबण्णा पुलगम यांची पत्नी नागमणी यांचे देखील दि.१३/०९/२०१२ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे. यातील अर्जदार क्र. १ ही के. अंजय्या बावण्णा पुलगम यांची पत्नी आहे. तर अर्जदार नं. २ हा मुलगा असून अर्जदार नं. ३ व ४ हे मुली आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. राधाबाई बाबण्णा पुलगम यांचे अनुक्रमे सून, नातू व नात आहेत. तसेच अर्जदार क्र.५ हा कै. प्रभाकर बाबण्णा पुलगम यांचा मुलगा असून अर्जदार नं. ६ व ७ हे मुली आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ते ७ हे कै. राधाबाई बाबण्णा पुलगम यांचे अनुक्रमे नातू व नात आहेत. मयत राधाबाई बावण्णा पुलगम नावे खालील मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन:- डि व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं.२३१ यासी नवीन सर्व्हे नं. २७ पैकी निलम श्रमजिवी नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागामधील प्लॉट नं. ४३३ याचे हद्द २५ ु ४० फुट असे एक